# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE

REACHING NATIONS

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXV | NOVEMBER 2023 | No. 10


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

स्तोत्र १३८ : १-८

१) मी अगदी मनापासून तुझे उपकार स्मरण करीन; अन्य देवांच्यासमक्ष तुझी स्तोत्रे गाईन.

२) तुझ्या पवित्र मंदिराकडे वळून मी तुझी उपासना करीन, तुझ्या दयेमुळे व तुझ्या सत्यामुळे मी तुझ्या नामाचें उपकार स्मरण करीन कारण तूं आपल्या संपूर्ण नामाहून आपल्या वचनाची थोरवी वाढविली आहे.

३) मी धावा केला तो तूं त्याच दिवशी ऐकला; तू मला हिम्मत दिली. तेव्हा माझ्या आत्म्याला सामर्थ्य प्राप्त झाले.

४) हे परमेश्वरा, पृथ्वीवरील सर्व राजे तुझे उपकारस्मरण करितील कारण त्यांनी तुझ्या तोंडची वचने ऐकली आहेत.

५) ते परमेश्वराच्या मार्गाविषयी गातील; कारण परमेश्वराचा महिमा थोर आहे

६) परमेश्वर परम थोर आहे तरी तो दिनाकडे लक्ष देतो; पण गर्विष्ठाला दुरुन ओळखतो.

७) मी संकटामध्ये भ्रमत असलो तरी मला तूं उत्तेजन देतोस; माझ्या वैऱ्यांच्या क्रोधावर तूं आपला हात चालवितोस, आणि तुझा उजवा हात माझा बचाव करितो.

८) परमेश्वर माझे सर्व काही सिद्धीस नेईल; हे परमेश्वरा, तुझी दया सनातन आहे; तू आपल्या हातचें काम मध्येच सोडू नको.

# तुमच्या युद्धाची निवड करा!

## RECOGNIZE YOUR BATTLE FIELD!



(रेव्ह. ॲन्जेलीन सेल्वाकुमारी)

काही दिवसांपूर्वी मी माझ्या कुटुंबासहित माझ्या एका मैत्रीणीला भेटण्याकरिता गेले, जीला मी बरेच दिवस भेटले नव्हते. भेटी करीता मी अतीशय उस्तुक होते. सर्व रस्ते नवीन झालेले आणी अनेक वळणे असल्यामुळे मी गुगल नकाशावर मार्गदर्शक म्हणून अवलंबून राहाण्याचे ठरविले. अनपेक्षितपणे, मी रस्ता चुकले, गुगल नकाशाचा मान राखून मी म्हणू शकते की, नकाशा मला उत्तम मार्ग दाखवित होता, परंतु खरे अर्थाने तो मार्ग उत्कृष्ट नव्हता. मी त्या मार्गाने गोलाकार फिरत होते आणि मला उशीर होत होता. माझा संयम-धीर सूटू लगला.

माझा विश्वास आहे, तुम्हांपैकी अनेक जणांना हा अनुभव आला असणार. रस्त्यावरून वाहनाने प्रवास करीत असताना वाटेत ट्रैफीक सिग्नलसाठी थांबलेले असताना गुगल नकाशा पुढे सरळ जावे कि उजवी-डावीकडे वळावे याच्या सूचनेची वाट पहात असताना माझ्या लक्षात आले कि, नकाशा सुचवीत असलेल रस्ता अतिशय अरुंद आहे. त्या अरुंद रस्त्यावरून मला वाहन चालविता येईल याची खात्री वाटत नव्हती. शंकेचे निरसरण करण्यासाठी; मी माझ्या वाहनासमोर असलेल्या दुचाकी स्वाराला मार्गाविषयी विचारायचे ठरविले, त्याने मला म्हटले. मी तुम्हाला ज्या ठीकाणी जावयाचे आहे. मी त्याच परीसरात रहातो, माझ्या मागे या. मला हायसे वाटले! यातील उत्तम भाग असा की, मी जरी

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल

पाच मिनिटांचा संदेश

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

पास्टर सॅम सेल्वा राज

यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

Every day – From 2.00 A.M.

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



## आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Bro. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Sis. L. Mariya Anjalin, M.A., M.Sc., B.Ed.
Rev. Dr. K.R. Rajasekaran
EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858
E.MAIL ID
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

## दया, शांति व प्रीति ही तुम्हांस विपुल मिळोत (यहूदा १:२)

प्रभु येशू ख्रिस्तामधील अति प्रिय बंधु आणि बहिणींनो!

आपल्या प्रभु येशू ख्रिस्तांची कृपा तुम्हांसह राहो. तुम्ही सर्व ठीक असाल अशी आशा बाळगतो. तुमच्या गरजांकरिता आम्ही प्रार्थना करीत आहेत.



बहीण साजीनी चेरियन



बंधु विलोम जोकोबस प्रिटोरीयस

आम्ही **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्यसाठी तो करीत असलेल्या त्याच्या स्वर्गीय पुरवठ्याबद्दल आम्ही आभारी आहोत. आम्हाला देवानें इंग्रजी मासिका करिता आमची प्रिय बहीण साजीनी चेरियन आणि आफ्रिकन मासिका करिता बंधु विलोम चोकोबस प्रिटोरीयस सह संपादक म्हणून दिल्याबद्दल त्यांचे आभारी आहोत. कृपया या दोघांची आणि उर्वरित १४ सहसंपादकांची आणि त्यांना त्याच्या ठिकाणी मदत करणाऱ्या मदतनिसांची प्रार्थनेत आठवण करित राहा.

**एको ऑफ हिज कॉल**च्या सर्व सेवाकार्याबद्दल आम्हाला चांगल्या प्रतिक्रिया प्राप्त होत आहेत. देव सर्व जगभरातील लोकांच्या जीवनाला स्पर्श करीत आहे. देव त्याच्या राज्याची उभारणीसाठी आमचा देखील उपयोग करुन घेत आहे; त्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानीत आहोत.

हल्ली आम्ही वेगवेगळ्या प्रकारच्या आत्मिक संघर्षातून जात आहोत असे अगोदरच तुम्हाला लिहिले आहे; तेव्हा आमच्या करिता प्रार्थना करा अशी विनंती करीत आहोत.

आम्ही प्रतिकूल आत्मिक परिस्थितीतून जरी जात आहोत, तुम्हां सर्वांच्या सुस्थितीसाठी प्रार्थना करणे सोडून दिलेले नाही.

जगाच्या रचनाबद्धतेत, प्रणालीत दिवसागणीक बदल होत असल्यामुळे, देवाचे सेवक ह्या नात्याने आपल्याला सामर्थी देवाच्या विशेष स्पर्शाची आणी रक्षणाची गरज आहे; यासाठी की आपल्याला त्याचा आपल्यावरील अभिषेक या बदलत्या जगातील लोकांपर्यत पोंहचविता यावा. आम्ही देखील या आत्मिक युद्ध भूमीत आघाडीत आहोत असे म्हणू शकतो.

आपला येशू देव आपला कप्तान आणि रक्षक आहे. आमेन!

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम
(+91) 98412 71858 / 98410 71858, E.mail : sam@echoofhiscall.org

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Media Ministry Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

(पान १ वरुन...)

दुचाकी स्वाराच्या मागे जात होते; तरी माझी गुगल नकाशाची यंत्रणा मला दुसऱ्याच मार्गाविषयी सूचना देत होती. मी, माझ्या यंत्रणेच्या सूचनेकडे दुर्लक्ष करून, दुचाकी स्वाराबद्दल आत्मविश्वास वाटत असल्यामुळे त्याच्याच मागे जाण्याचे ठरविले, त्याला रस्ता अगदी उत्तम ठाऊक होता आणि या अगोदर तो या मार्गाने गेला होता. ज्याच्यावर अवलंबून राहाता येईल असे कोणीतरी असावे हा केवढा मोठा दिलासा होता.

तुमच्या जीवनाला अशाप्रकारे मार्गदर्शन करणारे कोणीतरी असावे असे कधी तरी वाटले कां? तुमच्या वतीने कठीण आणि गुंतागुंतीचे निर्णय घेणारा, आणि केवळ त्याच्या मागे जावे लागावे? विश्वास ठेवा अगर ठेवू नका, आपल्या करीता असा एक आहे. त्याचे नाव येशू ख्रिस्त. त्याला आपला भविष्यकाळ, वर्तमान आणी भूतकाळ ठाऊक आहे. तो आपल्यासाठी आपला उद्या झालेलाच आहे. आपल्या पर्यंत येणारे सर्व काही त्याला अगोदरच ठाऊक असते. कारण त्याने "**सृष्टीच्या स्थापनेपूर्वी आपल्याला निवडले**". (इफिस १.४) आपल्या प्रत्येकासाठी त्याजकडे एक योजना आहे. यिर्मया २९.११ असे जाहिर करत आहे. परमेश्वर म्हणतो, "**तुम्हा विषया माझ्या मनांत जे संकल्प आहेत ते मी जाणतो, ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत, ते तुम्हास तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत**".

काही जरी घडले तरी यात शंका नाही की, आपले जीवन देवाने योजलील्या योजने अनुसरणार यात जीवनासाठी असलेले जे उत्तम, आव्हानात्मक आणि प्रतिकूल भागाचा समावेश आहे.

## १) जे सुयुद्ध ते करा :- योद्धा व्हा, चिंता करणारा नाहिः-

आपणास सामोरे जावे लागत असलेली परिस्थिती आवाहानात्मक, धैर्याने सामोरे जावे लागणारी आणि गोंधळात पाडणारी अशी वाटत असली, तरी ती शेवटी आपल्या लाभासाठी किंवा बऱ्याकरीता असते हे ओळखणे कठीण असते देवाने आपण प्रत्येकाला आज्ञापिले आहे की आपण योद्धा - किंवा सैनिक व्हावे - चिंता-काळजी करणारे नाहि. जीवनातील परीक्षा वारंवार आपल्याला निराशेकडे आणि जीवनाच्या उद्देशावरील आपला दृष्टिकोन गमावण्याकडे नेतात. तथापि, आपण हे विसरू नये कि, येशू ख्रिस्त या जगात आला, क्रुसाकर मृत्यु पावला, आणि पुनः जीवित झाला, यासाठी की अनंतकालिक जीवन आहे हे आपल्याला प्रकट करावे. आपले सध्या सुरु असलेले जीवन के क्षणभंगुर अनंत जीवनासाठी प्रशिक्षण पाया म्हणून कार्यरत आहे. "... **आपले रूपांतर होत असतां आपण त्याच्याशी समरूप होत आहो**". (२ करिंथ ३:१८), पौल १ तीमथ्य ६:१२ या वचनात म्हणतो त्याप्रमाणे **आपल्या आस्तीत्वाचा उद्देश युगानुयुगाचे जीवन मिळविणे असल्यामुळे आपल्याला जे सुयुद्ध ते करण्यासाठी** पाचारण करण्यात आले आहे.

पौलाच्याच शब्दात, "विश्वासासंबंधीचे जे सुयुद्ध ते कर, युगानुयुगाचे जीवन मिळीव, त्यासाठीच तुला पाचारण झाले आहे, आणि तूं पुष्कळ साक्षांसमोर तो सुस्वीकार करुन मान्य केला."

हे थोर किंवा भव्य असे युद्ध आपण कसे सुरु ठेवू शकतो? ते केवळ विश्वासा द्वारे विश्वासाशिवाय हे सुयुद्ध आपण लढू शकत नाही आणि अनंतकालीक जीवन सुरक्षित ठेवू शकत नाही. याचा अर्थ आपण आपल्या अस्तित्वाचा उद्देशच हरवला आहे किंवा चुकलो आहोत. स्तोत्र १४४:१ वचनात अतिशय सुंदररित्या म्हटलं आहे, "**परमेश्वरा जो माझा दुर्ग त्याचा धन्यवाद होवो; तो माझ्या हातांस लढावयास शिकवितो, माझ्या बोटास युद्धकौशल्य शिकवितो.**" देव आपला प्रशिक्षक आणि स्वर्गिय सेनेचा सेनापती, तो आम्हांस युद्धास तयार करतो तो सैन्याचा प्रभु आहे, आम्हांस जीवनातील आवाहानांना धैर्याने समोरे जाण्यास धैर्य देतो. "**परमेश्वर रणवीर आहे, याव्हे हे त्याचे नाम**" (निर्गम १५:३) आपण चिंता करणारे नसावे तर त्याच्या सारखे रणवीर व्हावे असे तो इच्छितो. आपण "सर्व जाणणाऱ्या सेनापती"च्या मार्गदर्शना खाली आहोत हे निश्चित. त्यामुळे माघार घेऊ नका! लक्षात ठेवा आपण युद्ध करित आहोत. ते आपला सेनापति, प्रभु याने क्रुसावर ते अगोदरच जिंकलेले आहे.



देव माझ्या बोटांना युद्धासाठी प्रशिक्षण देतो

## २) लढण्यासाठी शस्त्रे

युद्ध लढण्याकरिता देवाने आपल्याला शक्तिशाली शस्त्रे दिली आहेत. २ करिंथ १०:४ "**आमच्या युद्धाची शस्त्रे दैहीक नाहीत, तर तटबंदी जमीनदोस्त करण्यास ती देवाच्या दृष्टीने समर्थ आहेत**".

हि शस्त्रे इतकी शक्तीशाली आहेत कि ती तटबंदी जमीनदोस्त करु शकतात, मग ती पापाचे बंधन असो, किंवा पिढीचे शाप जे आपल्याला अपयशी असल्यासारखे वाटू देतात. तुमच्या कुटुंबात वारंवार एकाच प्रकारचा आजार पहावयास मिळत असेल किंवा कुटुंबात अविश्वासाची भावना असेल तर या शस्त्राचा उपयोग करण्याची हिच वेळ आहे. विजयाकरिता येशू ख्रिस्ताने क्रुसावर वाहिलेल्या रक्तावर दावा करा, शस्त्र वापरण्यास सुरुवात करु या आमच्या जीवनाच्या विरोधात असलेले युद्ध लढण्यासाठी.

### सर्वच युद्धे लढण्याची गरज नसते!

तरी देखील, आपल्याला कळले पाहिजे कि, सर्वच युद्धे काहि लढण्याची गरज नसते. कांही संग्राम किंवा आवाहने ही आपले लक्ष मुख्य लढ्यापासून दुसरीकडे

वळविण्या करीता येतात. आपण युद्धाची निवड शहाणपणाने करण्याची गरज आहे. अनावश्यक युद्ध लढण्यात तुमची शक्ति, वेळ आणि सामर्थ्य खर्च करू नका. जीवनात येणाऱ्या प्रत्येक संग्रामामध्ये गुंतून राहिली तर आपण दमून जाऊ, शीण होऊ आणि देवाने आपल्याला जी खरी लढाई लढण्याकरिता पाचारण केले आहे ती चुकेल.

### जितके पाचारण महान, तितकीच आवाहने महान!

देव तुम्हाला महान कार्याकरीता पाचारण करीतो, तेव्हा, ने पूर्ण करता येऊ नये त्यासाठी आवाहाने समोर येतील आणि आपण जर आवाहानांवरच लक्ष केंद्रीत करु तर त्या कार्यामागील असणारे आशीर्वाद गमावूं.

दाविद आणि गल्याथ यांची १ले शमुवेलाच्या पुस्तकात चित्रीत केलेली गोष्ट हे स्पष्ट करते हि आपल्यापैकी अनेकांसाठी परिचीत अशी गोष्ट आहे.

येथे आपण पहातो, गल्याथ इस्त्राएल सैन्याला त्याच्या बरोबर एकास-एक येऊन लढण्याचे आवाहन करतो. तो सतत ४० दिवस त्यांना शापोच्चारण करून, त्यांचे धैर्य खचवून त्यांना भयभीत करीत होता. **“त्या पुरुषास पाहताच सर्व इस्त्राएल लोक अत्यंत भयभीत होऊन त्याच्या पुढून पळून गेले”**. (१ शमुवेल १७:२४)


अशा स्थितीत १ शमुवेल १७:२६ या वचनातील दाविदाचा प्रतिसाद पाहू या, **“...या असुंती पलिष्ट्यानें जीवंत देवाच्या सेना तुच्छ लेखाव्या काय?”** दाविद पलिष्ट्याचे शब्द सहन करू शकत नाहि आपण बारकाईने त्याचा प्रतिक्रियेचा आभ्यास केला तर त्यांच्या युद्धासाठीचे डावपेच समजून येतील.

तो त्याच्या देवाच्या विरुद्ध कोणीही बोलू शकत नाही. अशा प्रकारे देवाशी त्याची समस्या जोडतो. दाविदाच्या दृष्टिने त्याची लढाई आता त्याची नसून ती देवाची आहे.

अनेकदा आपण आपली लढाई आपल्याच हातात घेऊन लढत असतो. मित्रानों माझी तुम्हाला आग्रहाची विनंती आहे. तुमचे युद्ध जो सर्व सामर्थी देव आहे त्याला द्या. तो तुमच्या करिता लढेल. दुर्देवाने अनेकदा सर्वकाही आपण स्वतंत्र्यरित्या हाताळण्याचा प्रयत्न करितो, ज्याचा परिणाम कंटाळवाणा आणि काहिवेळा विश्वासापासून दूर जाण्यात होतो.

### ३) सर्व गोष्टी बऱ्याकरिता होतात!

प्रिय बंधुनो आणि बहिणींनो, दाविदला युद्धभूमिवर आणण्या मागे विशिष्ट उद्देश होता. जरी दावीदला वाटत होते, कि तो त्याच्या भावाकरिता जेवण घेऊन आला होता; तरी देवाची त्यामागे दैवी योजना होती. दाविदाला इस्त्राएलाचा राजा बनविण्यासाठी ही पहिली पायरी होती. दावीदाला याची पुसटशी देखील कल्पना नव्हती. देवाकडे त्याच्यासाठी आश्चर्यकारक अशी योजना होती. परंतु त्याकरिता त्याला प्रथम आवाहनाला - लढ्याला सामोरे जावे लागले. हे आपल्या स्वत:च्या जीवनाशी पुष्कळ रितीने मिळते जुळते आहे. अनेकदा आपण युद्धाच्या



दावीदची गोल्याथा बरोबर लडाई

शेवटास असलेल्या आशीर्वादावर लक्ष केंद्रित करण्या ऐवजी वाहून जातो.

दाविदाने गल्याथाशी लढण्याकरिता त्याच्या समोर जावे अशी देवाची इच्छा होती. तथापि, सैतान, नेहमीच आपल्या जीवनातील देवाची योजना नाश करण्याचा प्रयत्न करीत असतो.

(...पान ६ वर)

नहेम्याह बाइबल कॉलेज
रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।
माध्यमः हिन्दी
सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार - ATA
सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 54 वर्षों से सेवारत वरिष्ठ पासवान
Certificate in Ministry
Diploma in Theology
योग्यता 10 वी या अधिक
जल्दी करें!
Contact : The Chairman, Nehemiah Bible College.
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
★ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ★

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२), गरजा भागविणे (रोम १२:१३), आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ नव्हेंबर ते १८ डिसेंबर २०२३ पर्यंत

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ स्तुति करिता मुद्दे

१९ नव्हेंबर : **नहेम्या बायबल कॉलेजेस**चे २०२३-२४चे पहिले सत्र यशस्वी रित्या पूर्ण करण्याकरीता आशीर्वाद दिल्याबद्दल.

२० नव्हेंबर : आमच्या मुद्रणालयात १६ भाषेतील मासिक छापून प्रसिद्ध करुन ते मिशन क्षेत्रात पाठविणे शक्य झाल्याबद्दल.

२१ नव्हेंबर : आमच्या दवाखान्यातील सेवेतील देवाच्या चमत्काराबद्दल.

२२ नव्हेंबर : आमच्या मुख्य आणि शाखा मंडळ्यांच्या रविवारच्या उपासनांमध्ये शुभवर्तमान न पोंहचलेल्या गटांना ते पोहचविण्यास शक्य होत असल्याबद्दल.

२३ नव्हेंबर : बहुविविध सेवाद्वारे शुभवर्तमान प्रसार करण्याच्या आमच्या वरिष्ठ पाळकांच्या समर्पितपणाबद्दल.

२४ नव्हेंबर : **एको ऑफ हीज कॉल**च्या मासिक सेवेसाठी समर्पित सहसंपादक देवून आशीर्वादीत केल्याबद्दल.

२५ नव्हेंबर : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनाचे भागीदार या सर्वांवरील देवाच्या कृपेबद्दल.

२६ नव्हेंबर : आम्हाला आधार देणाऱ्या आणि त्यांच्या सेवाकार्यात नियमित सहभागाबद्दल.

२७ नव्हेंबर : आमच्या कार्यालयीन व मुद्रणालयातील स्टाफच्या समर्पित सेवेबद्दल.

२८ नव्हेंबर : आम्हाला आमच्या इंग्रजी मासिकासाठी बहिण साजीनी चेरीयन व आफ्रिकन मासिकासाठी बंधु विल्हेम जेकोबस प्रेटोरीयस हे सहसंपादक देऊन आशीर्वादीत केल्याबद्दल.

२९ नव्हेंबर : **एको ऑफ हीज कॉल** यूट्यूबच्या माध्यमाद्वारे शुभवर्तमान न पोंहचलेल्या भागांपर्यंत ते नेण्यास मदत केल्याबद्दल.

३० नव्हेंबर : आमच्या मुख्य मंडळीत व शाखा मंडळ्यांत शब्बाथ शाळेकरिता आणखीन लेकरे देऊन आशीर्वादीत केल्याबद्दल.

०१ डिसेंबर : **सेंट पॉल्स मॅट्रीक्युलेशन स्कुल** आणि **नहेम्या बायबल कॉलेज**च्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना दैवी संरक्षण देऊन आशीर्वादीत केल्याबद्दल.

०२ डिसेंबर : आम्हाला **नहेम्या बायबल कॉलेजेस**चे २रे सत्र अधिक विद्यार्थ्यांसहित अधिक उत्साहाने सुरु करण्यास आशीर्वाद दिल्याबद्दल.

०३ डिसेंबर : **एको ऑफ हीज कॉल**च्या सर्व कार्यक्रमांवर असलेल्या त्यांचा हातांबद्दल.

## ✝ प्रार्थने करीता मुद्दे

०४ डिसेंबर : आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम सेल्वाराज आणि त्यांच्या कुटुंबाचे सर्व दुष्ट शक्तिपासून रक्षण व्हावे.

०५ डिसेंबर : आमच्या वरिष्ठ पाळकांना त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यात यश प्राप्त व्हावे.

०६ डिसेंबर : जगभरातील सर्व पाळक वर्गाच्या आणि मिशनऱ्यांच्या संरक्षणाकरिता.

०७ डिसेंबर : **नहेम्या बायबल कॉलेजेस**ला ATA ची अधिकृत मान्यता प्राप्त मिळावी.

०८ डिसेंबर : **नहेम्या बायबल कॉलेजेस**च्या व **सेंट पॉल्स मॅट्रीक्युलेशन स्कूल**च्या सर्व स्टाफ व विद्यार्थ्यांकरीता.

०९ डिसेंबर : कुमार अवस्थेतील आणि तरुण अवस्थेतील लेकरांमधील आत्महत्या करण्याची प्रवृत्ती नष्ट व्हावी.

१० डिसेंबर : जगभरातील वादळ आणि भुमिकंपाना प्रतिबंध व्हावा.

११ डिसेंबर : सर्व धर्मांमध्ये एकात्मता प्रस्थापीत व्हावी.

१२ डिसेंबर : आमच्या सेवा कार्याच्या वाढीकरिता आणि जगभरातील सुवार्ता प्रसार कार्याकरिता.

१३ डिसेंबर : पाळकांना त्यांच्या छोट्या लेकरांना आणि तरुणांना दैवी मार्गदर्शन प्राप्त व्हावे.

१४ डिसेंबर : जगभरातील सर्व ख्रिस्ती सेवाकार्यात संजीवन यावे.

१५ डिसेंबर : मणीपूर राज्यात शांतता आणि ऐक्य प्रस्तापीत व्हावे.

१६ डिसेंबर : मुख्य मंडळीतील आणि शाखा मंडळ्यातील सर्व विश्वासणाऱ्यांच्या रक्षणाकरिता आणि उत्तम आरोग्याकरिता.

१७ डिसेंबर : **एको ऑफ हीज कॉल** यूट्युब चॅनलद्वारे अनेक आत्म्यांचे तारण व्हावे.

१८ डिसेंबर : जगभरातील लहान लेकरे आणि तरुणांकरिता प्रार्थना करण्यासाठी अधिक लोक आमच्या सेवेत सहभागी व्हावेत.

(पान ४ वरुन)

## ४) निघून जाण्यास शिका

दावीद युद्धभूमीवर लोकांशी अतिशय उत्साहाने आणि उत्कट भावनेने बोलत असताना त्याने एक आवाज ऐकला १ शमुवेल १७:२८ ''दावीद त्या लोकांपाशी भाषण करीत होता ते त्याच्या वडील भाऊ अलीयाब यानें ऐकलें; तेव्हा तो दावीदवर संतापून म्हणाला, **''येथे आलास कशाला? थोडीशी शेरमेंढरे आहेत ती रानात तू कोणाच्या हवाली केली आहेत?''** अलीयाब याने त्याजवर तो घमेंडी आणि उद्यामपणाचा व तो केवळ लढाई पाहाण्यास येथे आला असा आरोप केला. दाविदावर केलेला हा आरोप मनाला दु:ख देणारा होता.

आपल्याला आशाप्रकारे कां वागविले जात आहेत, आणि आरोप करण्यात येत आहेत. आणि आपण काय चुक केली हे दाविदला कळेनासे झाले. आणि त्याने तेथून बाजूला जाण्याचे ठरविले. जसे १ शमुवेल १७:२९ आणि ३०व्या वचनात म्हटले आहे. हि वचने माझ्या समोर प्रतिध्वनीत होतात, कारण कांही प्रसंगी **आपण बाजूला जाणे शिकण्याची गरज आहे.** समोर येणाच्या प्रत्येक संग्रांमात आपण स्वत:ला गुंतवण्याची आवश्यकता नाही.

दाविदाला त्याच जागी उभे राहून थोरल्या भावाबरोबर वादविवाद करून केलेल्या खोट्या आरोपात स्वत:ची बाजू मांडता आली असती. आणि सर्व लोकांसमोर त्याच्यावर आरोप करून त्याचा अपमान केल्यामुळे त्याला तसे करण्याचा अधिकार होता. तरी देखील दाविदाने भांडण न करण्यासाठी निवड केली तर उलट तेथून निघून जाण्याचे ठरविले.

## ५) तुमची युद्धभूमी निरुपयोगी करु नका!

प्रिय मित्रांनो, देव करो आणि आपल्याला विशिष्ट परिस्थितीत बाजूला होण्याचे शहाणपण देवो. तुम्हाला मोठ्या उद्देशाकरिता पाचारण्यात आले आहे, अलियाबाचे शब्द तुम्हाला जे करण्यासाठी पाचारण करण्यात आले आहे, त्यापासून दुसरीकडे वळविण्यात येऊ नये. उलट आपल्या जीवनातील अलियाबाच्या विरुद्ध लढण्या ऐवजी, ''गल्याथाशी'' सामना करण्याचे लक्ष केंद्रित करावे. आपण देवाकरीता जीवन जगण्यासाठी जेव्हा महत्त्वाचा निर्णय घेतो, तेव्हा अडथळे, विरोधाला सामोरे जावे लागते हे सर्वांना सारखेच असते. हि अडखळणे अलियाबसारख्या लोकांच्या स्वरुपात येऊ शकतात. अशा स्थितीत, आपण जर त्यांचे आरोप आणि नकारार्थी विधान यामुळे क्षीण झालो- गळून गेलो, तर आपला उत्साह, समर्पण आणि उमेद चुर्र होऊन जाईल. नष्ट होईल.

अलियाबाने केलेल्या आरोपांकडे पाहूया:-

''येथे आलास कशाला?''

''थोडी शेरडेमेंढरें आहेत ती रानांत तू कोणाच्या हवाली केली आहेस?''

''तुझी घमेंड व तुझा मनाचा उद्यामपणा मी जाणून आहे''



**अलीयाबने दाऊदला प्रश्न विचारला**

''तू केवळ लढाई पाहण्यास येथे आला आहेस.''

दावीदाने जर अलियाबाच्या या सर्व आरोपांना उत्तर दिले असते, तर तो गल्याथाशी लढण्या ऐवजी अलियाबाशीच भांडत राहिला असता. युद्धभूमिवर येण्याचा त्याचा उद्देश पूर्ण झाला नसता. देव जेव्हा तुम्हाला गल्याथाशी युद्ध करण्यास बोलावितो, तेव्हा अलियाबाशी लढण्यास तुमची वेळ व्यर्थ घालवू नका. तुमच्या युद्धांची निवड सुज्ञपणे करा. या जगाच्या अलियाबाशी आपल्याला युद्ध करावयाचे नाहि, तर गल्याथा विरुद्ध आहे. बाजूला होण्यास-निघून जाण्यास शिका.

(...पान ९ वर)


## नहेम्या बायबल सायं कॉलेज
### चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई

माध्यम : तमिळ

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५४ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**Certificate in Ministry**
**Diploma in Theology**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना सेवा | : २४ तास |
| २. | बायबलकोर | : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी |
| ३. | एको ऑफ हिज कॉल | : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन |
| ४. | नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी) | |
| ५. | पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ | |
| ६. | महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क) | |
| ७. | प्रशिक्षण कार्यक्रम | |
| ८. | महासभा | |
| ९. | छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा | |
| १०. | शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : | प्रकाशने |
| ११. | सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल | : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल |
| १२. | शब्बाथ शाळा | : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी |
| **१३.** | **तामिळ उपासना** | **: सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी** |
| **१४.** | **हिन्दी उपासना** | **: सायंकाळी ४ वाजता - रविवारी** |
| **१५.** | **तेलगु उपासना** | **: सायंकाळी ५ वाजता - रविवारी** |
| **१६.** | **इंग्रजी आणि तामिळ उपासना** | **: सायंकाळी ६ वाजता - रविवारी** |
| १७. | स्त्रियांची प्रार्थना | : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी |
| १८. | पुरुषांची प्रार्थना | : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी |
| १९. | शिष्यत्त्वाची सभा | : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी |
| २०. | गृह प्रार्थना सभा | : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी |
| २१. | विशेष प्रभु भोजन | : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी |
| २२. | सेवाकाची समालोचन सभा | : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार |
| २३. | पालकांची प्रार्थना | : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार |
| २४. | रात्रभर प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार |
| २५. | उपास प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार |
| २६. | पवित्र सहभागिता | : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत |
| २७. | सकाळचे मनन | : पहाटे ५ वाजता - दररोज |
| २८. | कार्यालयीन स्टाफचे मनन | : सकाळी ९ वाजता - दररोज |
| २९. | कार्यालय | : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून) |

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : | **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

### त्याचा कोणताही हेतु त्याचा पासून मागे ठेविला जाणार नाही!

### NO PURPOSE OF HIS CAN BE WITHHELD FROM HIM!

१९६९ सालात, जेव्हा मी प्रभु येशु ख्रिस्ताचा माझा वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकार केला, मी 'हेरॉल्ड ऑफ हिज कमिंग' मासिकाचे संपादक पास्टर एस्. देवदासन यांच्या सेवेत सहभागी



**पास्टर एस्. सॅम सेल्वा राज आणि रेव्ह. एस्. देवदासन**

झालो. मी त्यांच्या सोबत तीन वर्षे होतो या समयात त्यांनी मला देवाची सेवा करण्या विषयी आत्मिक प्रशिक्षण दिले.

एका रात्री मी त्यांच्या सोबत बराच वेळ प्रार्थना करीत होतो. अचानक ते मजशी भविष्यात जग कसे होणार, आणि भविष्यात देव माझ्या द्वारे काय करणार याविषयी बोलू लागले. महान अशा गोष्टि ते बोलले. त्यावेळी त्या संबंधी मी विचार देखील करु शकत नव्हतो. त्यांनी ज्या महान सेवाकार्या विषयी भविष्य वर्तविले होते, ते करण्यासाठी मजकडे शैक्षणिक पात्रता नव्हती, किंवा पैसा, किंवा मनुष्यबळ देखील नव्हते.

मी त्यांना अपुरेपणाबद्दल समजावून सांगितले. आणि म्हणालो, ''पास्टर, देवाच्या सेवेत जरी मी एक कमीत-कमी छोटासा सेवक राहिलो तरी ते पुरेसे आहे.'' त्यावर त्यांनी उत्तर दिले, ''एका सामान्य व्यक्तिला उच्च्य स्थानी नेण्याकरीता, दोन गोष्टि आवश्यक आहेत. त्या म्हणजे **अ) विश्वास** आणि **ब) चांगला विवेकभाव**, जसे १ तीमथी १:१९ **''विश्वास व चांगला विवेकभाव धर.''** तुझे डोळे जसे सुरक्षित राखण्याचा तू काळजी घेत असतो तसेच या गोष्टी सुरक्षित राखशील तर मी आत्ताच म्हटल्याप्रमाणे तुला सर्व आत्मिक बढती प्राप्त होईल.'' देवाने मला आजपर्यंत या सर्व गोष्टिंची माझ्या कुवतीनुसार काळजी घेण्यास मदत केली.

हा लेख लिहिण्यास सुरुवात करण्याच्या अगोदर देव मजशी बोलला. त्याचे मंद आवाजातील शब्द कानावर पडताच मी मुग्ध झालो - मुखातून शब्द निघेना. तो मला म्हणाला, ''माझ्या प्रिय मुला, तूं आता उभा आहेस त्या इमारती विषयी थोडावेळ विचार कर. तुला ही कशी प्राप्त झाली? सध्या या इमारतीत ज्या सेवा सुरु आहेत त्याचा विचार कर अद्यावत तंत्रज्ञाना सहित असलेल्या मुद्रणालयाकडे पाहा, जे तळमजल्यावर आहे. पहिल्या मजल्यावरील जेथे २४ तास प्रार्थना सुरु असतात त्या माझ्या मंडळीचा गंभीरपणे तू विचार केला आहेस का? **नहेम्या बायबल कॉलेज**ची सेवा, आणि त्यामधील तरुण-तरुणींसाठी जी सेवा पहिल्या मजल्याच्या दुसऱ्या बाजूस सुरु आहे त्याचा विचार केला आहेस? दुसऱ्या मजल्यावरील **एको ऑफ हीज कॉल**च्या प्रशासकीय कार्यालयाचा विचार केला आहेस कां?''

तुझ्या क्षमतेच्यापलिकडेच्या सेवा करण्याकरीता, मी तुला जे तुझ्या पेक्षा अधिक कर्तृत्ववान आणि सुज्ञ आहेत असे अनेक अहरोन आणि यहोशवा तेव्हा आणि आता दिले आहेत. तूं जरी या आशीर्वादांचा विचार करीत नसलास, तरी मी तुझा नेहमीच विचार करतो. मी तुला पाचारण केले तेव्हां तू कसा होता? आणि आता तू कसा आहेस? तूझी सेवा मी अधीक वाढविणार आहे. माझा दास पास्टर एस्. देवदासन याने शिकविल्यानुसार **तुझ्या विश्वासात आणि चांगल्या विवेक भावात स्थिर राहा.** तुझ्या जीवनातील खडतर आणि कठीण मार्गातून वाटचाल करीत असताना निराश - नाऊमेद होऊ नकोस. तुला पाचारण करणारा मीच तो आहे नां? माझ्या मुखाद्वारे मी जे बोललो ते मी माझ्या हातांद्वारे करणार आहे धीट हो आणि कशाबद्दलहि दमून जाऊ नकोस.

देव माझ्या द्वारे ज्या अनेक अद्भुत आणि महान अशा गोष्टि करीतो. अनेकदा त्या मी समजू शकत नाही. माझ्या भावांनो आणि बहिणींनो, तुमच्यावर ज्या पुढाऱ्यांना ठेविले आहे. त्यांच्या आज्ञापाळा. जगाच्या मार्गाप्रमाणे चालू नका, तर पुढाऱ्यांच्या हाताखाली अधीन होऊन तुमचा विश्वास आणि चांगला विवेकभाव राखा. तुम्ही देवासमोर आणि तुमच्या पुढाऱ्यांसमोर प्रामाणिक राहाल, तर देव तुमच्या द्वारे महान अशा गोष्टि घडविल. महान अशी कृत्ये करण्यांकरिता तुमचा उपयोग करुन घेण्याकरिता कोणीही थांबवू शकणार नाही. मी केवळ देवालाच सर्व गौरव आणि सन्मान देतो.

(पान ६ वरुन...)

## ६) दिशेकडे/रोखाने धावण्यास शिका!

आपण बाजूला केव्हा व्हावे आणि दिशेकडे/रोखाने केव्हा धावावे हे शिकले



पाहिजे. ४९ व्या वचनात आपण पाहतो दावीद त्या पलिष्ट्याशी सामना करावयास सैन्य होते त्या दिशेकडे त्वरेनें धावला. ''जेव्हा सर्वजण गल्याथापासून पळून जात होते, दावीद त्याच्या रोखाने धावला. आपला सामना निवडण्याचे शिका. निराशेच्या शब्दांकडे, आरोपांकडे, लबाड्या, अपमान याकडे दुर्लक्ष करुन तुमच्या पाचारण्यावर लक्ष केंद्रीत करा. तुमच्या जीवनाचा उद्देश समजुन घ्या त्याकडे धावा. माघार घेऊ नका!

सामन्याची निवड कशी करावयाची याची समज दावीदाला वयाच्या फार लवकर आली. त्याच्या जीवनात त्याला सतत लढाया लढाव्या लागल्या होत्या, युद्ध भुमीवर त्याच्या आजुबाजूवरच नाही, तर त्याच्या जवळच्या कुटुंबियाबरोबर देखील.

## ७) तुमचे युद्ध देवाकडे निर्देशीत करा

२ शमुवेल १६ अध्यायात आपल्याला वृद्ध, प्रौढ, थकूनभागून गेलेला दावीत पहावयास मिळतो. तो आता त्याचा पुत्र अबशालोम ज्याने त्याचे राज्य घेतले त्याच्या पासून पळून जात आहे. ज्या वेळेस त्याला वाटत होते, त्याच्या लेकरांबरोबर विश्रांती घ्यावी, आराम करावा आणि लेकरांवर अवलंबून रहावे, अशावेळी त्याला स्वत:चा जीव वाचविण्यासाठी पळावे लागत आहे? दाविद शरिरानें, मनानें, आणि भावनेने थकलेला होता. अशा स्थितीत असताना शौलाच्या



शमुवेलने दाऊदला शाप दिला

घराण्यातील शिमीबिन सेरा नावाचा मनुष्य शिव्या-शाप देत त्याच्या समोर आला. **''...अरे खुनी मनुष्या, अधमा, नीच, चालता हो; ज्या शौलाच्या जागी तूं राज्य केले त्याच्या घराण्याच्यां रक्तपाताबद्दल परमेश्वराने तुझे पारिपत्य केले आहे आणि परमेश्वरानें तुझा पुत्र अबशालोम याच्या हाती राज्य दिले आहे; पाहा, तूं रक्तपात करणार मनुष्य आहेस, यास्तव तुझ्या दुष्टतेतच तूं गुरफटला आहेस.''** (२ शमुवेल १६:७-८)

इस्त्राएलांकरिता आणि शौलाच्या कुटुंबाकरिता सर्व काहि केल्यावर देखील हे सर्व ऐकून दाविदाला कसे वाटले असेल याची कल्पना करु शकता का? त्यावर खूनी, अधम असा आरोप केला जात होता! दाविद ज्या भयंकर यातना आणि दु:खातून जात असेल यांची कल्पना देखील करवत नाहि. हे वाचत असताना तुम्ही कदाचीत म्हणत असाल; ''हे माझ्या जीवना सारखेच वाटत आहे! मी सर्व काहि केल्यानंतर मला मिळत आहे, ते तोंडभरून शिव्या आणि आरोप मी स्वत: निश्चितच यासाठी पात्र नाहि!''

दाविदाच्या जागी दुसरा कोणी असता तर आरडा ओरड केली असती किंवा शिमीशी लढला असता, आणि स्वत:चे निर्दोशित्व सिद्ध केले असते. खरे तर दाविदाचा एक माणूस म्हणतो; **... ह्या मेलेल्या कुत्र्यानें माझ्या स्वामीराजास शाप द्यावा काय? मला त्याच्यावर चालून जाण्यास हुकूम द्या, मी त्याचें डोके मारितो.''** (२ शमुवेल १६:९). परंतु दाविदाचे प्रत्युत्तर पाहा. **दाविद त्याची समस्या देवाशी जोडतो तो म्हणतो त्याला शिव्याशाप देऊ द्या कारण परमेश्वरानेंच त्याला सांगितले असेल. मला होत असलेला उपद्रव कदाचित परमेश्वर पाहील; आणि त्या शिव्याशापाऐवजी मला चांगला मोबदला देईल.''** (२ शमुवेल १६:१२). आपल्याला हे आश्वासन हवे आहे - **''देवाच्या परवानगीशिवाय माझ्या जीवनात काहि देखील घडू शकणार नाहि, आणि जर त्याची परवानगी असेल तर त्याच्या शेवटी आशीर्वाद असणार.''**

प्रिय मित्रांनो, आपल्या प्रभुला देखील त्याची लढाई निवडावी लागली. त्याला प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा बायबल म्हणते येशू ''गप्प'' राहिला. केवळ एकाच वेळेस. त्याचप्रमाणे आपण देखील गप्प राहून देवाला आपली लढाई लढू देण्यास शिकावे. प्रभु करो आणि आपल्याला आपल्या लढाया निवडयाची कृपा पुरवो! देवाला त्याचे स्तान द्या! Let God be God!

## तातडीची गरज

आम्हाला **नहेम्या बायबल कॉलेज** करीता १००० हिन्दी ख्रिस्ती थियॉलॉजी पुस्तकांची गरज आहे. ती कोठून आणि कशी प्राप्त करता येतील याविषयी कळवावे.

- Pr. S. Sam Selva Raj, Editor
+91-98412 71858

## ग्रंथालयाकरिता पुस्तकांची गरज

आम्हाला आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल व नहेम्या बायबल कॉलेज**च्या ग्रंथालयाकरिता तामिल, इंग्रजी आणि हिन्दी भाषिक पुस्तकांची गरज आहे. तुमच्याकडे नवी किंवा जुनी (चांगल्या अवस्थेत) पुस्तके असतील आणि ती तुम्ही देणगी म्हणून देवू इच्छित असाल तर कृपया आमच्याशी संपर्क साधा.

- Pr. S. Sam Selva Raj, Editor
+91-98412 71858

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

## एको ऑफ हिज कोल

**यु ट्युब सबस्क्राईब करा**

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपा करुन आमच्या **एको ऑफ हिज कॉल यु ट्युब चॅनल** बघा व सबस्क्राईब करा. धन्यवाद

**- संपादक**

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 13th NOVEMBER 2023**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**